# झटपट पत्रलेखन



डॉ. पवन मांडवकर

महाराष्ट्र राज्य ग्रंथ निवड समितीने शासन मान्य यादीसाठी
निवडलेले पुस्तक सन १९९९ यादी क्र. २६१ अ

# झटपट पत्रलेखन

डॉ. पवन मांडवकर

श्री आशीर्वाद
एंटरप्राईजेस

झटपट पत्रलेखन/डॉ. पवन मांडवकर


* प्रकाशक *

श्री आशीर्वाद एंटरप्राईजेस

श्री. निवास लक्ष्मण मोहिते

'लक्ष्मण-निवास' सुतारमाळ, जिव्हाळा कॉलनी,

कोल्हापूर ४१६ ०१०

मोबा. नं. : ९४२०२५५६६१



© डॉ. पवन मांडवकर



'पद्मनिलया', ४२, शिवाजीनगर, यवतमाळ ४४५ ००१

मोबा. ९४२२८६७६५८, ९४०३०१४८८५



* प्रकाशन *

नवीन आवृत्ती : ३ नोव्हेंबर २०२२

* मुखपृष्ठ *

श्री. भरत यादव,

कोल्हापूर.

* अक्षरजुळणी *

ओम ग्राफिक्स, कोल्हापूर.

* मुद्रक *

दमयंती एजन्सी,

कोल्हापूर.

* किंमत *

रु. ८०/-



सदर पुस्तकाच्या आतील मजकुराशी प्रकाशक सहमत असेलच असे नाही.

(३) गुरूसारख्या मोठ्या माणसांना - गुरुवर्य, पूज्य, माननीय, सन्माननीय, आदरणीय.
(४) समवयस्कांना - प्रिय, मित्रवर्य.
(५) लहानांना - प्रिय, चिरंजीव.
त्यानंतर पुढच्या ओळीत त्यांना अभिवादन केले जाते.
(१) आई, बाबा, काका, काकू, आत्या, मावशी इत्यादींना - शिरसाष्टांग नमस्कार (शि.सा.न.)
(२) इतर मोठ्यांना - साष्टांग नमस्कार (सा.न.)
(३) समवयस्कांना - सप्रेम नमस्कार (स.न.), सप्रेम वंदे.
(४) लहानांना - सप्रेम आशीर्वाद (स.आ.), अनेकोत्तम आशीर्वाद (अ.आ.)
सामाजिक, कार्यालयीन पत्रांमध्ये सप्रेम नमस्कार विनंती विशेष (स.न.वि.वि.) असे लिहिले जाते.

६. सामाजिक, कार्यालयीन पत्रांमध्ये ज्यांना पत्र पाठवायचे त्यांच्या पत्त्यानंतर खाली एक ओळ सोडून विषय, संदर्भ लिहिल्या जातो.
७. संबोधन व अभिवादनानंतर पुढील ओळीपासून मजकुरास प्रारंभ करावा.
८. घरगुती पत्रात शेवटी लहान-मोठ्यांना यथोचित नमस्कार, आशीर्वाद लिहावे. मो.न.ल.आ. (मोठ्यांस नमस्कार, लहानांस आशीर्वाद ) असेही लिहिता येते. सामाजिक, कार्यालयीन पत्रांमध्ये 'कळावे' असे लिहिण्याचा प्रघात आहे.
९. पत्र संपवताना उजवीकडे - आपला, तुमचा, आपला विश्वासू, आपला कृपाभिलाषी, आपला नम्र असा यथोचित स्वनिर्देश केला जातो. त्याखाली स्वतःची सही या नाव किंवा दोन्ही लिहिले जाते. परीक्षेत मात्र सही अथवा नाव न लिहिता 'अ.ब.क.' वगैरे लिहावे.

असा हा पत्रलेखनाचा साचा आहे. या पत्रलेखनाचा अभ्यास विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, कारकून, व्यापारी अशा सर्वच क्षेत्रातील व्यक्तींना झटपट करता यावा म्हणून या पुस्तिकेत उदाहरणांवर अधिक भर दिलेला आहे. या 'झटपट पत्रलेखन' पुस्तिकेच्या अभ्यासानंतर पत्रलेखनात कुणालाही अडचण जाणार नाही, असा विश्वास वाटतो.

-पवन मांडवकर



# आई-वडिलांना पत्र

अ.ब.क.
द्वारा श्रीमती राधाबाई पांडे
गांधी चौक,
जि. अकोला-४४४ ००१
दिनांक ४-२-२०००

तीर्थरूप बाबा व ती. सौ. आई यांना,
शि. सा. न.

आजच परीक्षेचे वेळापत्रक मिळाले. आमच्या परीक्षा चार मार्चपासून सुरू होणार आहेत. मी आता अभ्यासाला खऱ्या अर्थाने सुरुवात केली आहे. यंदाही मला पहिल्या पाचमध्येच यायचाचे आहे.

आमच्या घर मालकीण राधाबाई खूपच चांगल्या स्वभावाच्या आहेत. आमच्या खाण्यापिण्याची आस्थेने चौकशी करतात. काळजी नसावी. पप्पूची परीक्षा कधी सुरू होणार आहे ? त्याला मन लावून अभ्यास करायला सांगा.

ती. आजीला शिरसाष्टांग नमस्कार. पप्पूला शुभाशीर्वाद.

तुमचीच मुलगी,
अ. ब. क.

प्रती,
श्री. वामनराव कुलकर्णी
सरस्वती नगर,
चिखली,
बुलढाणा ४४३ २०१



Scanned with CamScanner

## लहान भावास पत्र

अ.ब.क.
माळीपुरा,
अंजनगाव सुर्जी,
जि.अमरावती ४४४ ७०५
दि. १-२-२०००

चिरंजीव मंगेश,

अनेकोत्तम आशीर्वाद.

पत्र लिहिण्यास कारण की, कालच तुझे पत्र मिळाले. तू प्रथम सत्र चाचणी परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविला. त्याबद्दल तुझे हार्दिक अभिनंदन !

असाच खूप अभ्यास करीत जा. एक दिवस तू मोठ्या पदावर पोचशील, याची मला खात्री आहे. वसतिगृहात तुला मित्रपण चांगले मिळाले आहेत. त्यांनाही अभ्यासाचे महत्त्व पटवून दे.

इकडे आई-बाबांची प्रकृती चांगली आहे. काळजी नसावी. पुढील महिन्यात तुला मनिऑर्डरने पैसे पाठवीन.

बाकी सर्व ठीक. पत्राचे उत्तर पाठव. तुझ्या मित्रांना माझा यथोचित नमस्कार-आशीर्वाद सांग.

तुझाच दादा,
अ.ब.क.

प्रती,
श्री. मंगेश कांडलकर
शासकीय मुलांचे वसतिगृह,
अमरावती ४४४ ६०४



## मित्रास आमंत्रणपर पत्र

अ.ब.क.
सुर्या एन्क्लेव्ह,
टिळक नगर,
औरंगाबाद ४३१ ००५
दिनांक ५-१२-१९९९

प्रिय संजय,

सप्रेम नमस्कार.

माझी परीक्षा आजच संपली. तुझीसुद्धा संपली असेलच. यंदाच्या सुटीमध्ये मी व माझ्या येथील मित्रांनी बिबी का मकबरा, पाणचक्की, पैठण, वेरूळच्या लेण्या अशा पर्यटन स्थळांना सहलीच्या निमित्ताने जाण्याचे ठरवले आहे. या सहलीला तू सुद्धा यावेस, अशी माझी इच्छा आहे. तुझ्या आई-वडिलांना विचारून तू तुझा बेत कळव. त्यानुसार आम्ही कार्यक्रमाची आखणी करू.

तुझ्या आई-बाबांना माझा नमस्कार सांग. छोट्यांना आशीर्वाद. पत्राचे उत्तर लवकर पाठव.

तुझा मित्र,
अ.ब.क.

प्रती,
श्री. संजय काळबांडे
डेक्कन जिमखाना,
पुणे ४११ ००४



Scanned with CamScanner

# निमंत्रण पत्रिका

॥श्री॥

श्री/श्रीमती ------------------------------------------------

कळविण्यास अत्यंत आनंद होतो की, आमच्या स्वतःच्या वास्तूत आम्ही गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर प्रवेश करीत आहोत. या शुभप्रसंगी आयोजित स्नेहभोजनास आपण इष्ट मित्र-परिवारासह अगत्यपूर्वक उपस्थित राहावे, ही आग्रहाची विनंती.

आपले स्नेहांकित,
श्री. गजानन पाटील
सौ. सुलोचना पाटील

कार्यक्रम
गुरुवार दिनांक १८ मार्च, १९९९.
दुपारी १ वाजेपासून आपल्या आगमनापर्यंत.
'अनुश्री'
४२१,जवाहर कॉलनी,
पुसद नाका,
वाशिम ४४४ ५०५



# अभिनंदनपर पत्र

अ.ब.क.
क्वीन्स गार्डन,
मडगाव,
गोवा ४०३ ६०१
जानेवारी १५, १९९९

प्रती,
डॉ. भाऊ मांडवकर
कळंब,
यवतमाळ ४४५ ४०१

विषय : 'साहित्य वाचस्पती' मिळाल्याबद्दल अभिनंदन.

सन्माननीय भाऊसाहेब,
स.न.वि.वि.

आपल्याला विदर्भ साहित्य संघाची सर्वोच्च मानद उपाधी 'साहित्य वाचस्पती' देऊन गौरविण्यात आल्याचे दूरदर्शनवरून समजले. आपल्या आयुष्यभराच्या साहित्यसेवेचा हा गौरव आहे. आपल्या लेखणीचा आणि कर्तृत्वाचा संपूर्ण मराठी राज्याला अभिमान वाटतो.

आपणांस प्राप्त झालेल्या या पुरस्काराबद्दल मी आपले मनपूर्वक अभिनंदन करतो आणि अशीच साहित्यनिर्मिती आपल्याकडून सतत होत राहावी, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

कळावे.

आपला स्नेही,
अ.ब.क.

2-87

## मित्राचे अभिनंदन

अ.ब.क.
मु.पो. मोझरी,
ता. तिवसा,
जि. अमरावती ४४४ ९०२
२० जून, २०००

प्रिय राजू,

सप्रेम नमस्कार.

आजच वर्तमानपत्रात तुझा फोटो बघितला. तू बोर्डातून चौथा आलास, हे वाचून मला इतका आनंद झाला की, धावत येऊन तुला कडकडून मिठी मारावीशी वाटली. तुझं हार्दिक अभिनंदन ! मित्रा, शाब्बास !

तू तसा बालपणापासूनच हुशार आणि मेहनती आहेस. त्यामुळे तुला यशाच्या पाठीमागे धावावं लागत नाही, तर यशच तुझा पाठलाग करतं. भविष्यातही तुझी अशीच प्रगती होत राहावी, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

जमल्यास मोझरीला एखादी चक्कर टाक. माझ्या आई-बाबांना तुला भेटायची इच्छा आहे.

तुझ्या आई-बाबांना माझा नमस्कार सांग. तसेच घरातील इतर मोठ्यांना नमस्कार व लहानांना आशीर्वाद.

तुझा मित्र,
अ.

प्रती,
श्री. राजू ठाकरे
द्वारा श्री. गणपतराव ठाकरे
१२, 'रामगिरी',
वर्डा नगर जवळ,
यवतमाळ ४४५ ००१



## सांत्वनपर पत्र

अ.ब.क.
कॉंग्रेस नगर,
नागपूर ४४० ०१२
दि. २१-२-२०००

प्रिय विजय,

तुझ्या वडिलांच्या दुःखद निधनाची बातमी कळली. ऐकून धक्काच बसला. आपल्या सुस्वभावी व मनमिळाऊ वृत्तीमुळे ते सर्वांना आपलेसे वाटायचे. आयुष्यभर त्यांनी माणसे जोडली.

ईश्वरी इच्छेपुढे इलाज नाही. तुझ्या दुःखात मी माझ्या कुटुंबियांसह सामील आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो !

तुझा मित्र,
अ. ब. क

प्रती,
श्री. विजय जोशी
गोपुरी चौक,
वर्धा ४४२ ००१

# तक्रार

क. ख. ग.
यशवंत कॉलनी,
कारंजा लाड.
जि. अकोला ४४४ १०५
दि. ५ मार्च, २०००

प्रती,
मा. विभागीय अधिकारी,
महा. राज्य विद्युत मंडळ,
कारंजा लाड.
जि. अकोला ४४४ १०५

विषय : विद्युत पुरवठा वारंवार खंडित होण्याबाबत.

महाशय,
स.न.वि.वि.

यशवंत कॉलनी परिसरातील विद्युत पुरवठा गेल्या काही दिवसांपासून वारंवार खंडित होतो आहे. हे परीक्षांचे दिवस असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर त्याचा अनिष्ट परिणाम होतो आहे.

एक जबाबदार व जागरूक नागरिक या नात्याने मी आपणांस विनंती करतो की,जो तांत्रिक बिघाड असेल, तो त्वरित दूर करून आमच्या परिसरातील विद्युत पुरवठा नियमित करावा.

कळावे.

आपला विश्वासू,
क. ख. ग.



# तक्रार

अ. ब. क.
गोरक्षण रोड,
अकोला ४४४ ००१
दिनांक ९ मार्च ,२०००

प्रती,
प्रमुख कार्यपालन अधिकारी,
नगर परिषद,
अकोला.

विषय : गोरक्षण रोड परिसरात कचरा साठल्याबाबत.

महोदय,

मी एक जबाबदार व जागरूक नागरिक या नात्याने आपले लक्ष आमच्या वार्डातील साफसफाईच्या दुर्लक्षितेकडे वेधू इच्छितो.

गेल्या एक महिन्यापासून गोरक्षण रोड परिसरातील कचराकुंड्या स्वच्छ करण्यात आल्या नाहीत. परिणामी या परिसरात कचऱ्याचे व घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्याच्या दुर्गंधीने वार्डातील नागरिकांचे स्वास्थ्य धोक्यात आले आहे. याबाबत वार्ड सफाई निरीक्षकाकडे वारंवार तक्रारी करूनही दखल घेण्यात आली नाही.

या तक्रार पत्राद्वारे मी आपणांस नम्रपणे विनंती करतो की,आमच्या परिसरातील साफसफाईसाठी त्वरित पावले उचलावी व या दुस्थितीला जबाबदार कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी.

कळावे.

आपला विश्वासू,
अ. ब. क.



Scanned with CamScanner

# तक्रार

य. र. ल.
रुक्मिणी नगर,
अमरावती ४४४ ६०६
दि. १-१२-१९९९

प्रती,
मा. पोस्टमास्तर साहेब,
रुक्मिणी नगर पोस्ट ऑफीस,
रुक्मिणी नगर,
अमरावती ४४४ ६०६

विषय : मनिऑर्डर प्राप्त न झाल्याच्या संदर्भात.

महोदय,

मी २८ ऑक्टोबर, १९९९ रोजी माझे वडील श्री. र. ल. व., रेल्वे स्थानकाजवळ, दर्यापूर यांना आपल्या पोस्ट ऑफीसमधून पाचशे रुपयांची मनिऑर्डर केली होती. पण त्यांना ती मिळालीच नसल्याचे त्यांनी कालच मला तारेने कळवले.

माझ्या वडिलांनी दर्यापूरच्या पोस्ट ऑफीसात चौकशी केली असता, त्यांना काही माहिती मिळू शकली नाही. तसेच ती मनिऑर्डर परतही आली नाही.

मनिऑर्डर पावती क्रमांक ३६६३ असून पावतीची सत्यप्रत मी सोबत जोडली आहे. आपण लवकरात लवकर या संदर्भात चौकशी करून मला कळवाल, अशी आशा बाळगतो.

आपला विश्वासू,
य. र. ल.

सोबत : मनिऑर्डर पावतीची सत्यप्रत.



# तक्रार

य. र. ल.
'शलाका'
शिवाजी नगर,
पुणे ४११ ००५
दि. ९-९-२०००

प्रती,
मा. ठाणेदारसाहेब,
शिवाजी नगर पोलीस स्टेशन,
शिवाजी नगर,
पुणे.

विषय : सायकल चोरी गेल्याबद्दल.

महोदय,

काल दिनांक ८-९-२००० रोजी दुपारी शिवाजी नगरमधील आमच्या राहत्या घरासमोरून माझी नवीन सायकल चोरी गेल्याबद्दल ही तक्रार मी नोंदवीत आहे.

माझी सायकल हिरो कंपनीची असून तिचा रंग काळा आहे. सायकलचा चेसीस नंबर एच. ९५५२६२६ आहे. तिच्या हँडलवर माझे नावही टाकले आहे.

आपण यासंबंधी तक्रार दाखल करून घ्यावी व सायकलच्या तपास लागताच मला कळवावे, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,
य. र. ल.

सोबत : सायकल खरेदीच्या पावतीची सत्यप्रत.



Scanned with CamScanner

# विनंती अर्ज

अ. ब. क.
विद्यार्थी प्रतिनिधी
विदर्भ महाविद्यालय,
अमरावती.
दि. ५ सप्टें.,१९९९

प्रती,
मा. प्राचार्य,
विदर्भ महाविद्यालय,
अमरावती.

विषय : ग्रंथालयाची वेळ वाढवून मिळण्याबाबत.

महोदय,

कृ.सा.न.वि.वि.

मी आपल्या महाविद्यालयाच्या बी.ए. भाग २ मध्ये शिकत असुन 'विद्यार्थी प्रतिनिधी' म्हणून निवडून आलेलो आहे. आपल्या महाविद्यालयात आमच्यापैकी बहुसंख्य विद्यार्थी हे गरीब आहेत. घरी अभ्यासासाठी पोषक वातावरण नसल्याने आम्ही महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अभ्यास करतो.

महाविद्यालयाचे ग्रंथालय सकाळी ११ ते सायंकाळी ५ पर्यंत उघडे असते. ते जर सकाळी ९ ते सायंकाळी ७ पर्यंत उघडे राहिले, तर आम्हाला अभ्यासाकरिता अधिक सोयीचे होईल.

आमच्या या विनंतीचा आपण कृपया विचार करावा.

आपला कृपाभिलाषी,
अ. ब. क.
विद्यार्थी प्रतिनिधी



# विनंती अर्ज

अ.ब.क.
विद्यार्थी प्रतिनिधी
इंदिरा महाविद्यालय,
कळंब, यवतमाळ.

दि. २० ऑगस्ट, २०००

प्रती,
मा. प्राचार्य,
इंदिरा महाविद्यालय,
कळंब, यवतमाळ.

विषय : मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना करण्याबाबत.

पूज्य गुरुवर्य,

कृ.सा.न.वि.वि.

मी आपल्या महाविद्यालयात बी.ए. भाग १ मध्ये शिकतो. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून माझी अविरोध निवड झालेली आहे. आम्हा विद्यार्थ्यांची अशी इच्छा आहे की, आपल्या महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळ असावे. त्याकरिता हा विनंती अर्ज सादर करीत आहे.

या मंडळाच्यावतीने वाङ्मयीन चर्चा, मान्यवरांच्या मुलाखती, कवी संमेलने असे विविध कार्यक्रम आयोजित करता येतील. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास हे कार्यक्रम पोषक ठरतील.

आपण या अर्जाचा विचार करून आपल्या महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाच्या स्थापनेस आम्हाला परवानगी देऊन सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

आपला कृपाभिलाषी,
अ.ब.क.
विद्यार्थी प्रतिनिधी
इंदिरा महाविद्यालय.



Scanned with CamScanner

# विनंती अर्ज

अ.ब.क.
विद्यार्थी प्रतिनिधी
शिवाजी महाविद्यालय,
अमरावती.
दि. ११-११-२०००

प्रती,
मा. आगारप्रमुख,
महा. राज्य परिवहन मंडळ,
अमरावती डेपो,
अमरावती ४४४ ६०६

विषय : सहलीसाठी एस.टी.बस मिळण्याबाबत विनंती.

महोदय,

सा.न.वि.वि.

आमच्या महाविद्यालयाची सहल दि.११-१२-२००० रोजी चिखलदरा येथे नेण्याचे निश्चित झाले आहे. चार प्राध्यापक आणि चाळीस विद्यार्थी असे आम्ही चौरेचाळीसजण आहोत. त्यासाठी आम्हाला महा. राज्य परिवहन मंडळाची एक बस दोन दिवस आणि एक रात्र एवढ्या कालावधीसाठी हवी आहे.

आमच्या या सहलीकरिता बस भाडे किती लागेल ? किती रक्कम आगाऊ जमा करावी लागेल ? या गोष्टींचा खुलासा करून त्वरित उत्तर पाठवावे, जेणेकरून आम्हाला पुढील कार्यक्रम आखता येईल.

कळावे.

आपला विश्वासू,
अ.ब.क.
विद्यार्थी प्रतिनिधी
शिवाजी महाविद्यालय,
अमरावती.

प्रत : मा.प्राचार्य, शिवाजी महाविद्यालय, अमरावती यांच्या माहितीसाठी.



# विनंती अर्ज

अ.ब.क.
विद्यार्थी प्रतिनिधी
इंदिरा महाविद्यालय,
कळंब ४४५ ४०१
दि.१-७-२०००

प्रती,
मा. आगारप्रमुख,
महा.राज्य परिवहन मंडळ,
यवतमाळ डेपो, यवतमाळ.

विषय : एस.टी.बसफेऱ्या वाढविण्याबाबत.

महोदय,

इंदिरा महाविद्यालयाचा 'विद्यार्थी प्रतिनिधी' या नात्याने मा.प्राचार्यांच्या संमतीने मी हा विनंती अर्ज सादर करीत आहे.

आमच्या महाविद्यालयातील सुमारे शंभर विद्यार्थी कळंब-चिंचोली या मार्गावरील सावरगाव, पारसोडी, डोंगाव, उमरी अशा विविध गावांना राहतात. आमच्या महाविद्यालयाची वेळ दुपारी बारा ते सायंकाळी पाच अशी आहे. महाविद्यालय सुटल्यावर सायंकाळी पाचच्या सुमारास चिंचोली मार्गावर केवळ एक बस जाते. ती बस अगोदरच प्रवाशांनी भरून येते. परिणामी इतके विद्यार्थी त्या बसमध्ये घेण्यास बस चालक नकार देतात.

तेव्हा आम्हा विद्यार्थ्यांची अशी विनंती आहे की, आपण या मार्गावर सायंकाळी पाच ते सहाच्या सुमारास बसफेऱ्या वाढवाव्या. आम्ही आपले आभारी राहू.

आपला विश्वासू,
अ.ब.क.
विद्यार्थी प्रतिनिधी
इंदिरा महाविद्यालय.

प्रत : मा.प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब यांच्या माहितीसाठी.



Scanned with CamScanner

## निमंत्रण पत्र

अ.ब.क.
स्नेहसंमेलन सचिव
कला महाविद्यालय,
खामगाव ४४४ ३०३
दि. २१-११-२०००

प्रती,
मा.श्री.कु.मु.उजळंबकर
११.प्रमोदवन,
२४२ ब. शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ००२

विषय : स्नेहसंमेलनाचे उद्घाटक म्हणून निमंत्रण.

मा.महोदय,
सा.न.वि.वि.

दरवर्षीप्रमाणे यंदाही आमच्या महाविद्यालयाने स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहाने साजरे करण्याचे ठरवले आहे. पुढील महिन्याच्या म्हणजेच डिसेंबरच्या १०,११ व १२ या तारखांना विविध कार्यक्रमांचे आयोजन आम्ही करणार आहोत. या स्नेहसंमेलनाचे उद्घाटक म्हणून आपणांस हे निमंत्रण पाठवीत आहोत.

आपणांस १० डिसेंबर ही तारीख सोयीची नसल्यास आपण आपल्या सोयीची तारीख लवकर कळवावी, म्हणजे निमंत्रण पत्रिका छापता येतील.

आपण आमच्या या विनंतीचा स्वीकार कराल अशी आशा वाटते. आपला येण्याजाण्याचा खर्च व योग्य मानधन आमची संस्था देईल.

कळावे.

आपला कृपाभिलाषी,
अ.ब.क.
स्नेहसंमेलन सचिव
कला महाविद्यालय.

प्रत : प्राचार्य, कला महाविद्यालय, खामगाव. (माहितीकरिता)



## काव्यवाचनासाठी आमंत्रण

अ.ब.क.
सचिव
मराठी वाङ्मय मंडळ,
भारतीय महाविद्यालय,
अमरावती ४४४ ६०५
दि. ११ नोव्हेंबर,१९९९

प्रती,
मा.श्री.अरविंद पोहरकर
मु.पो. नेरपिंगळाई,
ता. मोर्शी, जि. अमरावती ४४४ ७०१

विषय : काव्यवाचनासाठी आमंत्रण.

महोदय,
स.न.वि.वि.

आपण लिहिलेला 'इंडिया टुडे' हा काव्यसंग्रह आम्हा विद्यार्थ्यांत अतिशय प्रिय झालेला आहे. आपल्या सुंदर कविता आपल्याकडूनच ऐकायची आम्हा सर्वांची इच्छा आहे. पुढील महिन्यात आपण आमच्या महाविद्यालयात काव्यवाचनासाठी वेळ काढू शकाल का ?

आपल्या सोयीचा दिवस आपण कळवावा. आपला येण्या-जाण्याचा खर्च व योग्य ते मानधन आमच्या महाविद्यालयातर्फे देण्यात येईल. हे पत्र मी आमच्या प्राचार्यांच्या संमतीने पाठवीत आहे.

कळावे.

आपला नम्र,
अ.ब.क.
सचिव
मराठी वाङ्मय मंडळ

प्रत : मा.प्राचार्य, भारतीय महाविद्यालय,अमरावती.



Scanned with CamScanner

# आभार पत्र

क.ख.ग.
विद्यार्थी प्रतिनिधी
कला महाविद्यालय,
यवतमाळ ४४५ ००१
दि. १०-१२-२०००

जावक क्रमांक : २२५/२०००

प्रती,
मा.श्री.बाबा मोहोड
मोती नगर,
अमरावती ४४४ ६०६

विषय : स्नेहसंमेलनास उपस्थित राहिल्याबाबत आभार.

आदरणीय बाबा मोहोड यांना,
कु.सा.न.वि.वि.

आमच्या विनंतीस मान देऊन आपण आमच्या महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाचे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहिलात, त्याबद्दल आम्ही आपले मनःपूर्वक आभारी आहोत.

आपले हे प्रेम आणि आपला आशीर्वाद यापुढेही आम्हाला लाभावा, हीच इच्छा.

कळावे.

आपला कृपाभिलाषी,
क.ख.ग.
विद्यार्थी प्रतिनिधी
कला महाविद्यालय,
यवतमाळ .



# जाहिरात

## सोनामाता हायस्कूल
### चहांद, ता.राळेगाव, जि.यवतमाळ ४४५ ३०८

**शिक्षक पाहिजे**

पद - माध्यमिक शिक्षक (वर्ग ८ ते १० करिता) एक जागा, अनारक्षित.
अर्हता - बी.ए.(द्वितीय श्रेणी), बी. एड. बी.ए.ला राज्यशास्त्र असणे अनिवार्य.
वेतनश्रेणी - १३५०-४०-१४४०-४०-१८५०-२२००. शिवाय इतर शासनमान्य भत्ते.
मुलाखतीची तारीख - २०-५-९९ दुपारी दोन वाजता.
मुलाखतीचे स्थळ - सोनामाता हायस्कूल, चहांद.
अर्ज पोचण्याची अंतिम तारीख - ५-५-९९.

सूचना-
१. अर्जासोबत प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती जोडाव्या.
२. मुलाखतीस येताना मूळ प्रमाणपत्रे आणावी.
३. उमेदवार नोकरीत असल्यास वरिष्ठांमार्फत ना हरकत प्रमाणपत्र सादर व्हावे.
४. मुलाखतीस येण्या-जाण्याचा खर्च उमेदवाराने स्वतः करावा.
५. अनुभवी उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

मुख्याध्यापक
सोनामाता हायस्कूल,चहांद.



Scanned with CamScanner

# नोकरीकरिता अर्ज

क.ख.ग.
२८, नवकेतन सोसायटी,
कोथरूड, पुणे ४११ ०२९

प्रती,
मा.मुख्याध्यापक,
सोनामाता हायस्कूल ,
चहांद, ता.राळेगाव,
जि. यवतमाळ ४४५ ३०८

विषय : 'शिक्षक' पदासाठी अर्ज.
संदर्भ : दि. १-५-९९ च्या 'दै.लोकमत'मधील आपली जाहिरात.

महोदय,

दि. १-५-९९ च्या 'दै.लोकमत'मधील आपल्या जाहिरातीनुसार मी शिक्षक पदासाठी हा अर्ज करीत आहे.

पूर्ण नाव - क.ख.ग.
पत्ता - २८, नवकेतन सोसायटी,
कोथरूड, पुणे ४११ ०२९
जन्मतारीख - १-५-७८ वय - २१वर्षे
शैक्षणिक पात्रता - बी.ए. बी.एड.
बी.ए.ला राज्यशास्त्र विषयासह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण.
अनुभव - नाही.

या अर्जासोबत आपणांस आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती पाठवीत आहे. माझी पात्रता लक्षात घेऊन आपण मला मुलाखतीस अवश्य बोलवावे, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,
क.ख.ग.

पुणे,दिनांक २-५-९९

सोबत :१. शाळा सोडल्याचा दाखला (जन्मतारखेसाठी)
२. बी.ए.ची गुणपत्रिका
३. बी.एड.ची गुणपत्रिका
(सर्व सत्यप्रती आहेत.)



# नोकरीकरिता अर्ज

क.ख.ग.
बोदवड,
भुसावळ ४२५ ३१०
दि.१०-६-२०००

प्रती,
मा. प्राचार्य,
मिलिंद महाविद्यालय,
औरंगाबाद ४३१ ००१

विषय : अधिव्याख्याता पदासाठी अर्ज.
संदर्भ : दि. ९-६-२००० च्या 'दै.सामना'मधील आपली जाहिरात.

महाशय,

दि. ९-६-२००० च्या 'दै.सामना'मधील अर्थशास्त्र विषयाच्या अधिव्याख्याता पदाच्या आपल्या जाहिरातीनुसार मी हा अर्ज करीत आहे. माझी पात्रता,अनुभव व इतर माहिती खालीलप्रमाणे -

पूर्ण नाव - क.ख.ग.
पत्ता - बोदवड,
भुसावळ ४२५ ३१०
जन्मतारीख - ९-६-१९७५ वय- २५ वर्षे
शैक्षणिक पात्रता - एम.ए.(अर्थशास्त्र) - प्रथम श्रेणी
नेट परीक्षा उत्तीर्ण
अनुभव - नाही.

वादविवाद, वक्तृत्व अशा अनेक स्पर्धांमध्ये मी पारितोषिके प्राप्त केली आहेत. आपण माझ्या अर्जाचा अवश्य विचार करावा, ही विनंती.

आपला विश्वासू,
क.ख.ग.

सोबत : सर्व सत्य प्रती
१. शाळा सोडल्याचा दाखला (जन्मतारखेसाठी)
२. एम.ए.ची गुणपत्रिका
३. नेट प्रमाणपत्र.



Scanned with CamScanner

## मुलाखतीचे आमंत्रण

### समाजकार्य महाविद्यालय

दूरध्वनी : (०७२१) २५८४९

प्राचार्य,
समाजकार्य महाविद्यालय,
अमरावती ४४४ ६०१
दिनांक २०-६-२०००

जावक क्रमांक ५२/२०००

प्रती,
श्री. संजय देशमुख
सीताबर्डी,
नागपूर ४४० ०१२

विषय : मुलाखतीस उपस्थित राहण्याबाबत.

महाशय,

आपण 'अधिव्याख्याता' पदासाठी केलेला अर्ज प्राप्त झाला. संबंधित पदाच्या मुलाखती ३०-६-२००० रोजी होणार आहेत. आपण आपल्या मूळ प्रमाणपत्रांसह दुपारी दोन वाजता महाविद्यालयाच्या कार्यालयात उपस्थित राहावे. मुलाखतीस येण्या-जाण्याचा खर्च दिला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

कळावे.

आपला,
अ.ब.क.
प्राचार्य
समाजकार्य महाविद्यालय.



## शिफारस पत्र

क.ख.ग.
सुल्तानपुरा,
ता. अचलपूर,
जि. अमरावती ४४४ ८०६
दि. १५-७-२०००

प्रती,
श्री.आरिफ अली
उर्दू एज्युकेशन सोसायटी,
चिखली,
बुलढाणा ४४३ २०१

मा.श्री.आरिफ अली,
स.न.

बऱ्याच दिवसानंतर पत्र पाठवत आहे. राग नसावा.मागे मी रफिक शेख या तरुणाबद्दल आपल्याशी बोललो होतो, हे आपल्या स्मरणात असेलच.

रफिक हा प्रामाणिक, हुशार व गरजू तरुण आहे.समयपालन, कामातील नीटनेटकेपणा, व्यवस्थितपणा व अचूकता हे त्याचे गुणविशेष आहेत. त्याचे शिक्षण एम.ए.(उर्दू) झाले असून त्याने कॉम्प्युटर क्षेत्रातील काही अभ्यासक्रमही पूर्ण केले आहेत.

आपल्या संस्थेत त्याला कामाची संधी दिली तर तो कधीही तक्रारीची वेळ येऊ देणार नाही व आपल्या अपेक्षेप्रमाणे दिलेले काम पूर्ण करील.

कळावे.

आपला,
क.ख.ग.



Scanned with CamScanner

# रजेचा अर्ज

अ.ब.क.
इंदिरा महाविद्यालय,
कळंब,
यवतमाळ ४४५ ४०१
दि. १५-७-१९९९

प्रती,
मा.प्राचार्य,
इंदिरा महाविद्यालय,
कळंब,
यवतमाळ ४४५ ४०१

विषय : एक दिवसाची किरकोळ रजा मिळण्याबाबत.

महोदय,

उद्या दिनांक १६-७-९९ रोजी घरगुती कामानिमित्त मला महाविद्यालयात येणे जमणार नाही. तरी माझी दि. १६ जुलै ९९ ची एक दिवसीय किरकोळ रजा मंजूर करण्यात यावी, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,
अ.ब.क.
अधिव्याख्याता
इंदिरा महाविद्यालय,
कळंब.



# चौकशी पत्र

## जयसेवा वाचनालय

दूरध्वनी : (०७२१)
६७७८५२

विजय कॉलनी,
अमरावती ४४४ ६०६
मार्च २८, २०००

प्रती,
मा.व्यवस्थापक,
बँक ऑफ महाराष्ट्र,
रुक्मिणी नगर शाखा,
अमरावती.

विषय : चेक जमा न झाल्याबाबत.

महाशय,

आपल्या बँकेतील आमच्या चालू खाते क्रमांक ९८५२० मध्ये दिनांक २८ जानेवारी,२००० रोजी रुपये दोन हजार दर्शनी मूल्य असणारा एक चेक जमा केला होता. चेकचा क्रमांक यू २२१२२१ असून तो 'महाजन ब्रदर्स' यांच्याकडून प्राप्त झाला आहे. चेक जमा करून दोन महिने पूर्ण झाले तरी आमच्या खात्यात अद्याप रक्कम जमा झालेली नाही.

आपण या बाबतीत लक्ष घालून सहकार्य करावे, ही विनंती. कळावे.

आपला विश्वासू,
अ.ब.क.
ग्रंथपाल
जयसेवा वाचनालय,
अमरावती.



Scanned with CamScanner

## आर्थिक सहायतेकरिता पत्र

अ.ब.क.
सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०
दि. २२-७-२०००

प्रती,
मा. मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य,
'वर्षा'
मुंबई.

विषय : हृदयाच्या शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदतीसंबंधी.

महोदय,

मी एक महाविद्यालयीन विद्यार्थी असुन माझे वडील शेतकरी आहेत. वाढत्या वयोमानानुसार माझ्या वडिलांची प्रकृती ढासळत चालली आहे. गेल्या काही महिन्यांपासून त्यांना हृदयविकाराचा त्रास सुरू झाला आहे. सरकारी दवाखान्यात तपासणी केल्यानंतर तज्ञांनी 'ओपन हार्ट सर्जरी' करण्यास सुचविले. त्याकरिता तीन लाख रुपये खर्च येणार आहे. मी एकुलता असुन अद्याप स्वतःच्या पायावर उभा झालेलो नाही. वैदर्भीय शेतीची दुरावस्था आपण जाणताच. त्यामुळे मला कुणाच्यातरी आर्थिक मदतीची गरज आहे.

आपणांस या पत्राद्वारे मी कळकळीची विनंती करतो की, आपण मला मुख्यमंत्री निधीतून अथवा अन्य सामाजिक संघटनेद्वारे वडिलांच्या शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत मिळवून देऊन सहकार्य करावे.

आपले उपकार मी कधीच विसरणार नाही.

आपला कृपाभिलाषी,
अ.ब.क.



## चौकशी पत्र

### सेवा प्रकाशन

दूरध्वनी : (०७२१)
६७३३८६
जा.क्र. : १९९/२०००

विजय कॉलनी,
अमरावती ४४४ ६०६
जून २२, २०००

प्रती,
मा. व्यवस्थापक,
अंजली प्रिंटर्स,
शिंदे नगर,
पुणे ४११ ०२१

विषय : छपाई दरपत्रकासंबंधी.

महाशय,

स.न.वि.वि.

आमच्या आगामी पुस्तकांच्या छपाईसाठी विविध संस्थांकडून दरपत्रके मागवीत आहोत. कृपया आपलेही दरपत्रक पाठवावे. पत्रकात खालील गोष्टींच्या दरांचा समावेश असावा.

१. मुखपृष्ठ छपाई – चार रंगी
२. मजकूर छपाई – डेमी साईज, कृष्णधवल

आपले दर आम्हाला पटल्यास आपणांस आगामी पुस्तकांची कामे देण्याचा विचार करू.

कळावे.

आपला विश्वासू,
अ.ब.क.
व्यवस्थापक
सेवा प्रकाशन,
अमरावती.



Scanned with CamScanner

# मागणी पत्र

अ.ब.क.,
प्राध्यापक कॉलनी,
पांढरकवडा,
जि. यवतमाळ ४४५ ३०२
दि. ११-५-२०००

प्रती,
मा.व्यवस्थापक,
सेवा प्रकाशन,
विजय कॉलनी,
अमरावती ४४४ ६०६

विषय : पुस्तकांची मागणी.

महोदय,
स.न.वि.वि.
आपल्या प्रकाशनाची खालील पुस्तके मला हवी आहेत.

| | पुस्तकाचे नाव | लेखक | प्रती |
|---|---|---|---|
| १. | काय गुन्हा केला ? | बा.सं.गडकरी | २ |
| २. | झटपट शुद्धलेखन | पवन मांडवकर | २ |
| ३. | भांडारवाडी | बाजीराव पाटील | १ |

वर उल्लेखित पुस्तके व्ही.पी.ने माझ्या पत्त्यावर पाठवावी.आगाऊ रक्कम म्हणून पन्नास रुपयांची मनिऑर्डर पाठवत आहे.
कळावे.

आपला विश्वासू,
अ. ब. क.



# वृत्तलेखन

## ट्रकने स्कूटरस्वारास चिरडले

अकोला, दि.५ (बातमीदार)
काल दुपारी दोन वाजता गांधी रोडवर एक भीषण अपघात होऊन त्यात एक व्यक्ती ठार तर एक व्यक्ती जखमी झाली.

सविस्तर वृत्त असे की, गांधी रोडवरील निशांत टॉवर्सजवळ एम.टी.आर.८१८ क्रमांकाच्या ट्रकची एका स्कूटरला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात धडक लागली व त्यात स्कूटरचालक घटनास्थळी ठार झाला. स्कूटरवर मागे बसलेली व्यक्ती गंभीर जखमी झाली असून तिला तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले.

अपघातात सापडलेल्या दोन्ही व्यक्तींची ओळख अद्याप पटावयाची आहे. ट्रकचालक फरार असून पोलीसांनी अज्ञात ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



Scanned with CamScanner

# वृत्तलेखन

## इंदिरा महाविद्यालयात स्वातंत्र्यदिन साजरा

कळंब, दि. १६ (प्रतिनिधी)

स्थानिक इंदिरा महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे यंदाही स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

पांढरे शुभ्र पोशाख परिधान केलेल्या प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत प्राचार्यांच्या हस्ते भारताचा तिरंगा मोठ्या डौलाने फडकला. ध्वजारोहणानंतर देशभक्ती गीतगायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यात अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध संगीतकार भोजराज चौधरी हे होते.

कार्यक्रमाचे संचलन प्रा.रा.तु.आढे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.कु.रेखा वाठ यांनी केले.

288



# अभिप्राय

अ.ब.क.
सिडको वसाहत
औरंगाबाद ४३१ ००५
दि. २८-११-२०००

प्रती,
मा. संपादक,
दै. तरुण भारत,
पुणे४११००२

विषय : दि. २७-११-२००० च्या अग्रलेखाबाबत.

महोदय,

दिनांक २७-११-२००० च्या 'दै.तरूण भारत'मधील अग्रलेख मला फारच आवडला. ग्रामीण जीवनातील समस्यांना वाचा फोडणारा हा लेख वाचून मन हेलावून गेले. आपला देश हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. पण 'कृषी' सोडून 'ऋषी'कडे तो वळत चालला आहे. यावर उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. विशेषतः ग्रामीण भागात हे लोण अधिक वेगाने पसरत आहे. या व इतर ग्रामीण समस्यांवर आपण प्रकाश टाकला, त्याबद्दल आपले अभिनंदन करतो आणि आभारही मानतो.

असेच लेख आपल्या वृत्तपत्रातून सातत्याने प्रकाशित व्हावे व दीन,दलित,पीडित अशा सर्वांच्या समस्यांना वाचा फुटावी, हीच अपेक्षा.

आपला,
अ. ब. क.



Scanned with CamScanner

2८6

# अभिप्राय

अ.ब.क.
भवानी पेठ,
जळगाव ४२५ ००१
दि. २६-१-२०००

प्रती,
मा.संयोजक,
'टर्निंग पॉईंट',
दूरदर्शन केंद्र,
मुंबई ४०० ०१८

विषय : दि. २४-१-२००० रोजी प्रसारित कार्यक्रमाबाबत.

महोदय,

स.न.वि.वि.

दि. २४ जानेवारी, २००० रोजी मुंबई दूरदर्शनवरून प्रसारित झालेला 'टर्निंग पॉईंट' हा कार्यक्रम बघितला. फारच आवडला. विज्ञानाविषयी आपण जी माहिती दिली, ती खरोखरच अमूल्य अशी होती.

अशीच मौल्यवान माहिती आपल्या प्रत्येक कार्यक्रमातून मिळावी, ही अपेक्षा.

कळावे.

आपला,
अ.ब.क.



Scanned with CamScanner